जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 2 JAN 2017

पुढारी

# यशासाठी ध्येयाचा ध्यास हवा

## परीक्षा नियंत्रक महेश काकडे; शिवाजी विद्यापीठ आविष्कार स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सर्जनशीलता, उपक्रमशीलता आणि नावीन्याचा ध्यास ही यशस्वी संशोधनाची त्रिसूत्री आहे. आयुष्याच्या प्रत्येक बाबतीत तिचा अवलंब केल्यास यश निश्चित मिळेल. यासाठी विद्यार्थ्यांनी ध्येयाचा ध्यास घ्यायला हवा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी केले.



**कोल्हापूर : आविष्कार-२०१६-१७ या विद्यापीठस्तरीय संशोधन प्रकल्प स्पर्धेत सहभागी विद्यार्थी गटाचा संशोधन प्रकल्प पाहताना इतर विद्यार्थी.**

विद्यापीठाच्या लोककला केंद्रात आज आविष्कार-२०१६-१७ ही विद्यापीठस्तरीय संशोधन प्रकल्प स्पर्धा पार पडली. स्पर्धेचा पुरस्कार वितरण समारंभ राजर्षी शाहू सभागृहात झाला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे होते.

काकडे म्हणाले, आविष्कार स्पर्धेत नवनव्या कल्पना, संकल्पना सादर केल्या जात आहेत, ही अत्यंत उत्साहवर्धक बाब आहे. असे उपक्रम हे केवळ कोण्या एका संस्थेसाठी नव्हे, तर संपूर्ण देशातील समाजाच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरत असतात. त्यांचा समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी उपयोग होणे आवश्यक आहे. बीसीयूडी संचालक डॉ. मोरे म्हणाले, पदवीस्तरावरील विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्तीला चालना देणे हा आविष्कार स्पर्धेच्या आयोजनामागील मुख्य उद्देश आहे. यावेळी आविष्कारचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव म्हणाले, गेल्या तीन दिवसांत अनुक्रमे कोल्हापूर, सांगली व सातारा येथे जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धा झाल्या. त्यामध्ये प्रत्येकी सरासरी तीनशेहून अधिक स्पर्धक सहभागी झाले.

आजच्या विद्यापीठस्तरीय स्पर्धेत २५० हून अधिक स्पर्धक सहभागी झाले. यावेळी सहभागी स्पर्धक, टीम लीडर व परीक्षक यांनी प्रातिनिधिक मनोगत व्यक्त केले. मोनाली खाचणे यांनी आभार मानले. विशाल ओव्हाळ यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी बीसीयूडी संचालक डॉ. मोरे व काकडे यांच्या हस्ते स्पर्धेचे पुरस्कार वितरण करण्यात आले. दरम्यान, आज सकाळी लोककला केंद्रात परीक्षा नियंत्रक काकडे यांच्या हस्ते फीत कापून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटने स्पर्धेचे संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 JAN 2017
लोकमत

# कॉमर्स विभागाला पाच पारितोषिके

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील पाच संशोधकांनी यश मिळविले. या विजेत्यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात होणाऱ्या राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

त्यात पदव्युत्तर गटामध्ये एम. कॉम. भाग एकच्या तेजस्विनी सूर्यवंशी या विद्यार्थिनीने मानव्यविद्या शाखेमधून प्रथम क्रमांक पटकविला. तिने बचतगटाच्या अभ्यासावर सादरीकरण केले. संशोधक विद्यार्थी गटामध्ये पीएच.डी.चे विद्यार्थी अनिकेत जाधव यांनी प्रथम क्रमांक, तर एम. फिल.चे महमद रियाज फणीबंद यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. जाधव यांनी 'बँक कर्मचाऱ्यांची वित्तीय साक्षरता', तर फणीबंद यांनी 'महापालिकेच्या वित्तीय परिस्थितीवर तोडगा' याबाबत सादरीकरण केले. शिक्षक गटामधून अधिविभागातील एन. यु. खामकर, एस. व्ही. काटकर यांनी यश मिळवले. त्यांना डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. (प्रतिनिधी)